व शांत होईल. त्याची योगशास्त्रावर प्रीती होईल. तो रजोगुणी होईल. त्यास
दीन बुध्दीनें मित्रांपासून दुःख होईल. त्यास सुख होईल. तो संन्यास येईल.

श्लोक.

अजानस्यमातापिताबाहुरेव वृथासर्वतोदुष्टकर्मा
धिपत्यात्॥शनैरेधनेकर्मगःशर्मसंदो जयोविग्रहे
जीविकानोहिंतस्य॥१॥ शनौव्योमगेविंदतेकिंन्व
मातारूक्संशौशवंहश्यतेकिंतु पित्रा॥ निधिः-
स्था पितोवापिताचाकृषि श्च प्रणश्येश्र्ववंहश्यते
देवसोवा॥२॥ ॥१०॥

टीका:- ज्याच्या दशम स्थानीं शनी असेल तर त्यास माता शेळी ह्मणजे तीशे ळीच्या दुधानें वाढेल त्यास आई असणार नाहीं आणि त्याचा बाप त्याचा बा हू ह्मणजे तो स्वपराक्रमानें पोट भरील त्यास बाप असणार नाहीं. तो दुष्ट कर्मे करील यामुळें त्यानें सर्व व्यर्थ होईल. तो अवका शानें मोठ्या भाग्याचा होईल. तो सुख मुळें मंद होईल. त्यास युद्धामध्ये जय मिळेल. त्याची जीविका न रीचे व्यापारावर होईल. आणि माता त्या पुत्रा पासून सुख पावेल कीं काय? पिता त्या पुत्राचे बाल्यावस्थेचें सुख पाहील काय.? त्यानें ठेवलेलें द्रव्य व त्याणें केलेली शेतकी यांचा नाश होईल आणि कदाचित् दैवयोगानें प्राप्त होतील

श्लोक

स्थिरं वित्तमायुः स्थिरं मानसं च स्थिरा नैव रोगाद-
यो न स्थिराणि ॥ अपत्यानि शूरः शतेष्वेक एव अपं
चाधिको लाभगे भानुपुत्रे ॥ ११ ॥

टीका:- ज्याच्या एकादशभावीं शनी असेल तर त्यानें आयुष्य, द्रव्य, मनही स्थिर होतील. त्याचे रोग स्थीर होणार नाहींत. त्याचीं अपत्यें फार चपल हो तील. आणि त्यांत त्याचा एक पुत्र शंभरांत शूर होईल. तो भोगाचा पंची होईल.

श्लोक.

अशूरो भवेन्निष्ठुरो निस्त्रपो वा सचेल्लग्नपो वै भवं य
ज्ञहेतुः ॥ प्रसन्नो बहिर्नो गृहे मंदनेत्रो रिपुध्वंसकृ
त्सूर्यसूनो व्ययस्थे ॥ १२ ॥

टीका:- ज्यास द्वादश स्थानीं शनी असेल तर तो शूर होणार नाहीं. निष्ठु र निर्लज्ज असा होईल. जर हा शनी त्याच्या जन्मलग्नाचा अधिपती- असेल ह्मणजे जन्मलग्न मकर, कुंभ यांपैकीं असून शनी द्वादश स्थानीं असेल तर त्यानें सर्व वैभव यज्ञासाठीं होईल. तो घराचे बाहेर आनंदांत राही

ल. त्याचे नेत्र मंद होतील. तो शत्रूंचा नाश करील.

इतिशनिविचारः॥

अथराहुविचारः॥

श्लोक.

समर्थः परेषांस्वभावान्स्ववृत्त्यासगाच्छादयेत्साधयेत्स्वान्परार्थान्॥ तमोयस्यलग्नेसभग्नारिवीर्यः कुटुंबेधृतिंभूरिदारोपियायात्॥१॥

टीका.– ज्याच्या जन्म लग्नीं राहू आहे. तो आपल्या वृत्तीनें दुसऱ्याचे स्वभाव झांकील तो आपले आणि दुसऱ्याचे अर्थ सिध्ध करील. तो शत्रूंच्या तेजाचा भंग करील. त्यास बहुत स्त्रिया असल्या तरी तो कुटुंबाचें रक्षणा विषयीं धैर्य सोडणार नाहीं.

श्लोक.

कुटुंबेतमोनष्टमूलंकुटुंबंमृषाभाषितानिर्भयोवित्तपालः॥ स्ववर्गप्रणाशोभयंशस्त्रतश्चाप्यवश्यं बलिभ्योलभेत्सारवश्यं॥२॥

टीका.– ज्यास धन भावीं राहु असेल तर त्यानें कुटुंब नाहींसें होईल. तो मिथ्या भाषण करील. तो भीतिरहित होत्साता धनाचें पालन करील. त्या च्यापक्षाचा नाश होईल. त्याला शस्त्रभय होईल. तो नियमानें बलिष्ठलोकांच्या सतेंत राहील.

श्लोक.

ननागोथसिंहोभुजाविक्रमेणप्रयातोहसिंहीसुते तत्समत्वं॥ तृतीयेजगत्सोदरत्वंसमेतिप्रयातोषिभाग्यंकुतोयत्नहेतुः॥३॥

टीका.– ज्याच्या तृतीयस्थानीं राहू असेल तर मनुष्य असतां गजकिंवा

सिंह यासारिखा पराक्रमी होईल. त्यालासर्वजग सहोदरभावाप्रमाणें सुख देईल. तो स्वतः भाग्यवान होईल. त्यासभाग्याविषयीं प्रयत्नकरणें नको.

श्लोक.

चतुर्थेकथंमातृनैरुज्यदेह्नोत्हृदिज्वालयाशीतलं-
किंबहिः स्यात् ॥ सचेदन्यथामेषगोकर्कगोवाबुध
क्षेः स्फुरेभूपतेर्बंधुरेव ॥ ४॥

टीका:- ज्याच्या चतुर्थ स्थानीं राहू असेल तर त्याच्या मातेचें शरीर निरो गी असणार नाहीं त्याच्याहृदयांत अग्निपेटल्याप्रमाणें संतापराहील. तेणें करून त्यास बाह्यशीतलोपचारापासून उपयोगकाय. जरहा चवथाराहू मे षकिंवा कर्क राशींस असेल तर हेंच फलउलटें होईल. आणि जरबुधक्षेत्रां त असेल तर. तोमनुष्य केवळ राजाचा बंधुच होईल.

श्लोक.

सुतेतत्सुतोत्पत्तिकृत्सिंहिकायाः सुतो भाभि
नीचिंतयाचित्ततापः ॥ सतिक्रोडरोगेकिमाहा
रहेतुः प्रपंचेनकिंप्रापकारष्टवर्ज्ये ॥ ५॥

टीका:- ज्याच्या पंचमभावीं राहू असेल तर त्यामनुष्यास पुत्रसं तती होईल. तो बायकोच्या चिंतेनें त्याचें चित्तास ताप होईल. त्यास उदर रोग होईल. मग आहाराचा हेतू कशाचा? त्यास प्रपंच असून उपयोग नाहीं. कारण त्यास द्रव्या दृष्ट असणार नाहीं.

श्लोक.

बलंबुद्धिवीर्येधनंतद्दशोनास्थितोवैरिभावेपि
येषांजनानां ॥ रिपूणामरण्यंदहेदेवराहुः स्थि
रंमानसंमातुलानोपितृव्याः ॥ ६॥

टीका:- ज्यास षष्ठस्थानीं राहू असेल त्यास बल, बुध्धी, पराक्रम,

धन, हीं फळें प्राप्त होतील. त्याच्या शत्रूंचें अरण्यही राहू जाळील. त्यानें चित्त स्थीर होईल. त्याला मातुल आणि पितृव्य असणार-नाहींत.

श्लोक.

विनाशंभवेत्सुहृन्निनेतद्युवत्योरुजाधातुपाकादि
नाचंद्रमर्दी ॥ कदाहेयथाल्लोडयेज्जातवेदाः
वियोगापवादाःशमंनप्रयांति ॥ ७ ॥

टीका.- ज्याच्या सप्तम भावीं राहू असेलतर धातुविकृतीच्या रोगा पासून त्याच्या तरुण स्त्रिया मरतील. तो कुंडांतर्गत अग्नीप्रमाणें मनांत घालमेल फार करील. त्याज विषयींचे वियोग-आणि अपवाद हे शांत होणार नाहींत.

श्लोक.

नृपैःपंडितैर्वंदितोनिंदितोसौसकृद्भाग्यला-
भोसकृद्भंगएव ॥ धनंजानकंतंजनास्त्य
जंतिश्रमोग्रंथिकृद्रंध्रगोब्रह्मशत्रुः ॥ ८ ॥

टीका.-ज्याच्या अष्टम स्थानीं राहू असेल तर तो मनुष्य राजे, पंडित, यांहीं वंदित आणि निंदित असा होईल. त्याचा एकवार भाग्योदय होईल. आणि एकवेळ भंगही होईल. तो पितृधनानेंच धनिक होईल त्याला लोक सोडितील. त्यानें केलेला श्रम त्यास प्रतिबंधक होईल.

श्लोक.

कनीयःकृतंनरराजेंद्रबंधुवर्गंसदापालयेत्पूजि
तःस्यगुणैःस्वैः ॥ सभायांतकोयस्यचेद्भा
त्रिकोणेतमःकौतुकीदेवतीर्थेदयालुः ॥ ९ ॥

टीका.— ज्याच्या नवम स्थानीं राहू असेल तर तो विचारी होईल. तो आपण केलेलें कर्म टाकणार नाहीं. तो आपल्या बांधवांचें पालन करील. तो आपल्या गुणानीं पूजित होईल त्या वांचून सभा शोभणार नाहीं. तो देव, तीर्थें याजविषयीं दयाळू होईल. त्याचा स्वभाव आश्चर्यकारक होईल.

श्लोक.

सदा मूर्च्छसंसर्गतो तीव्रगर्वं लभेन्मानिनीकामिनीभोगसुच्चैः ॥ जनैर्व्याकुलो सौख्यं नाधिशेते मदर्थव्ययी क्रूरकर्मा चरन्खेऽगो ॥ १०

टीका.— ज्याच्या दशम भावीं राहू असेल तर त्यास मूर्च्छ, संगतीनें मोठा गर्व होईल. त्यास मोठ्या मानिनी स्त्रियांचा उपभोग होईल. त्यास लोकांचा त्रासानें सुखाची निद्रा येणार नाहीं तो उन्मार्ग करितां द्रव्य खर्चील. तो क्रूर कर्म करणारा होईल.

श्लोक.

सदा मूर्च्छतोर्थं लभेत्साभिमानश्चरेत्किंकरेण व्रजेत्किं विदेशं ॥ परार्थान नर्थी हरेद्धूर्तबंधुः सुतोत्पत्तिसौख्यं तमो लाभगश्चेत् ॥ ११ ॥

टीका.— ज्यास एकादश भावीं राहू असेल तर त्यास नेहमी मूर्च्छापासून द्रव्य मिळेल तो अभिमानी होईल. तो खिजमतगारा वांचून फिरणार नाहीं तो दूरदेशचा प्रवास करणार नाहीं. तो अनर्थ करणारा मनुष्य दुसऱ्याचें द्रव्य हरण करील. तो धूर्त होईल. त्याला पुत्रा पासून सुख होईल.

श्लोक.

तमो द्वादशे दीनतां पार्श्वशूलं प्रयत्नेकृतेनर्थतामातनोति ॥ खलैर्मित्रतां साधुलोकैरिपुत्वं

विरामेमनोवांछितार्थस्यसिद्धिं ॥१२॥

टीकाः- ज्याच्या द्वादशभावीं राहु असेल तर त्याचा स्वभाव दीन होईल त्याला पोटांत शूळ होईल. त्याणें प्रयत्न केला असतां अनर्थ होईल. तो दुर्जनाशीं मैत्री करील. तो साधुशीं वैर करील त्याचा मनोरथ श्रमाच्या अंतीच पूर्ण होईल.

इतिराहुविचारः॥

अथकेतोर्भावफलानि.

श्लोक.

तनुस्थः शिखीबांधवेक्लेशकर्ता भयंदुर्जनेभ्यो
मनोव्यग्रतास्यात् ॥ कलत्रादिचिंतासदोद्विग्न
तानशरीरेव्यथामारुतीनैकधापि ॥१॥

टीकाः- ज्यास तनुभावीं केतू असेल तर बांधवां पासून क्लेश होतील. त्यास दुर्जनांपासून भय होईल. त्याचें मन व्यग्र होईल. त्याला स्त्रीपुत्राची काळजी लागेल. तो सर्वकाळ उद्विग्नराहील त्याच्या शरीरांत बहुत प्रकारच्या वायूचे उपद्रव होतील.

श्लोक.

धनेकेतुरव्यग्रताकिंनरेशात्धनेधान्यनाशः कु
टुंबाद्विरोधः॥सुखवानामयंकिंवचः सत्कृतंवाप्न
वेत्स्वेगृहेसौम्यगहेतिसौख्यं॥२॥

टीकाः- ज्याच्या धन भावीं केतू असेल तर त्याला राजा पासून अव्यग्रता होईल काय ? त्याचा सर्व द्रव्यांत धान्याचा नाश होईल. तो आपल्या कुटुंबाशीं वैर करील. त्याला नीरोग सुख आणि सत्काराचें भाषण हीं प्राप्त होणार नाहींत तो केतू स्वगृहीं किंवा बुधाच्या घरीं असेलतर फारच सौख्य होईल.

श्लोक.

शिखीविक्रमेशत्रुनाशंविवादंधनंभोगमैश्वर्यतेजोधिकत्वं॥सुहृद्वर्गनाशंसदाबाहुपीडांभयोद्वेगचिंताकुलत्वंविधत्ते॥३॥

टीका:- ज्याच्या तृतीयस्थानीं केतू असेल तर त्याच्या शत्रूंचा नाश होईल. तो वादांत जिंकेल. तो द्रव्यमिळवील. तोउपभोग करील. त्यास ऐश्वर्य प्राप्त होईल. तो तेजस्वी होईल. त्याच्या सुहृदांचा नाश होईल. त्याच्याबाहूस निरंतर पीडाहोईल. तो भय, त्रास चिंता याहीं आकुळ ह्मणजे व्याप्त असा राहील.

श्लोक.

चतुर्थेतुमातुःसुखंनोकदाचित्सुहृद्वर्गतोपैतृकंनाशमेति॥शिखीबंधुवर्गात्सुखंस्वोच्चगेहेचिरंनोवसेत्स्वगृहेव्यग्रतात्र॥४॥

टीका:- ज्याच्या चतुर्थ स्थानीं केतू असेल तर त्याच्या मातेला सुख होणारनाहीं. तो आपल्या मित्रां पासून बापाचें सर्वस्व बुडेल. तो केतू स्वगृहांत उच्च स्थानचा असलातर त्यास बांधवां पासून सुखहोईल. तो स्वगृहांत फारदिवस वास करणार नाहीं. त्याचें अंतःकरणव्यग्र राहील.

श्लोक.

यदापंचमेराहुपुच्छंप्रयातितदासोदरेवातघातादिकष्टं॥स्वबुद्धिर्व्यथासंततिःस्वल्पपुत्रासदोषोभवेद्वीर्ययुक्तोनरोपि॥५॥

टीका:- ज्याच्या पंचम स्थानीं केतू असेल तर त्याच्या सहोदरास वायु, घात या पासून कांहीं दुःखें होतील. त्याच्या बुध्धीस व

था होईल. त्याला थोडे पुत्र होतील आणि कन्या बहुत होतील. तो पराक्रमी असून दोषी होईल.

श्लोक.

तमः पृष्ठभागेगतेषष्ठभावेभवेन्मातुलान्मान
भंगोरिपूणां॥ विनाशश्चतुष्पात्सुखंवातुच्छवि
त्तंशरीरेसदा, नामयंव्याधिनाशः॥ ६॥

टीका:- ज्याच्या षष्ठ स्थानीं केतू असेल तर त्याच्या मामा पासून त्याच्या शत्रूंचा नाश होईल. आणि मानभंग ही होईल. त्याला चतुष्पदां पासून सुख होईल. त्याजवळ थोडें द्रव्य राहील. त्याला निरंतर आरोग्य होईल. त्याच्या व्याधींचा नाश होईल.

श्लोक.

शिखीसप्तमेभूयसीमार्गचिंतानिवृत्तस्यना
शोथवावारिभीतिः॥ भवेत्कीटगः सर्वदालाभकारीकलत्रादिपीडाव्ययोव्यग्रतांच॥ ७॥

टीका:- ज्यास सप्तम भावीं केतू असेल तर त्यास मार्ग चिंता फार होईल. तो मार्गांत नाश पावेल किंवा त्याला पाण्या पासून भय होईल. जर तो केतू कर्क, वृश्चिक, या राशीस असेल तर सर्व काल लाभ करील. त्याला खर्चापासून व्यग्रता होईल. त्याच्या स्त्री पुत्रांस पीडा होईल.

श्लोक.

गुदंपीड्यतेर्शादिरोगैरवश्यंभयंवाहनादेःस
वित्तस्यरोधः॥ भवेदष्टमेराहुपुच्छेर्थलाभःस
दाकीटकन्याजगोयुग्मगेतु॥ ८॥

टीका:- ज्याच्या अष्टम भावीं केतू असेल तर त्याचें गुदद्वार अ

शरीरिरोगानीं पीडित होईल. त्याला वाहना पासून भय होईल. त्याच्या द्रव्यास प्रतिबंध येतील. जर हा केतू मेष, वृषभ, मिथुन, कर्क, कन्या, वृश्चिक या राशीस असेल तर सर्व काळ द्रव्य लाभ-होईल.

शिखीधर्मभावेयदाक्लेशनाशः सुतार्थीभवे-
न्म्लेछतोभाग्यवृध्धिः॥ सहोत्थव्यथांबाहुरो
गंविधत्तेतपोदानतोहास्यवृध्धिंतदानीं॥९॥

टीका:- ज्यास भाग्य भावीं केतु असेल तर त्यास क्लेश होणार नाहींत. त्याला पुत्राची फार इछा होईल. त्याचा भाग्योदय म्लेछ-लोकां पासून होईल त्याच्या सहो दरास उपद्रव होतील. त्याला-बाहु रोग होईल. त्यास तप, दान, या पासून उपहास्य वृध्धी होईल.

श्लोक.

पितुर्नोसुखंकर्मगोयस्यकेतुर्यदादुर्भगंकष्ट
भाजंकरोति॥ तदावाहने पीडितंजातुमेषं-
वृषाआलिकन्यासुचेछत्रुनाशं॥१०॥

टीका:- ज्यास दशमभावीं केतु असेल तर त्यास बापाचे किंवा त्या पासून पित्यास सुख होणारनाहीं तो दुष्टभाग्याचा होईल. तो कष्टा चें पात्र होईल. त्यारे वाहना मध्यें मेंत्यास पीडा होईल. जर मेष, वृषभ. कन्या, वृश्चिक, याराशीस असून दशमभावीं आहे तर-मात्र शत्रूंचा नाश करील.

श्लोक.

सुभाग्यः सुविद्याधिकोदर्शनीयः सुगात्रः सु
तेजाः सुवस्त्राणितस्य॥ दरेपीड्यतेसंततिर्दु

र्भगाच शिखीलाभगः सर्वलाभंकरोति॥११

टीका:- ज्यास एकादश स्थानीं केतु आहे तो भाग्यशाली, विद्वान्, देखणा, पूर्ण अवयवांचा, तेजस्वी, उत्तम वस्त्रानींयुक्त असाहोईल. त्या सभयानें पीडाहोईल. त्याची संतती दैवहीन होईल. त्याला सर्व लाभ होतील.

श्लोक.

शिखीरिः फगोबस्तिगुल्फांघ्रिनेत्रेरुजापीडनंभा
तुलान्नैवशर्म॥सदाराजतुल्यंनरंसव्ययंतद्विपू-
णांविनाशंसदासोकरोति॥१२॥

टीका:- ज्याच्या द्वादशस्थानीं केतु असेल तर त्याच्या मांड्या, उपस्थ, पाय, डोळे, या स्थळीं रोगानें पीडा होईल. त्यास माया पासून सुख होणार नाहीं. तो राजा सारिखा फार खर्चिक होईल. त्याच्या शत्रूंचा नाश होईल.

॥इतिकेतुविचारः॥

॥अथग्रंथालंकारः॥

श्लोक.

चमत्कारचिंतामणौयत्खगानांफलंकीर्तितंभ
ट्टनारायणेन॥पठेद्योद्विजस्तस्यराज्ञःसभायां
समक्षंप्रवक्तुंनचान्येसमर्थाः॥१॥

टीका:- या चमत्कारचिंतामणी नावाच्या ग्रंथांत नारायण भट्टानें जीं ग्रहांचीं फलें सांगितलीं आहेत तीं जो राज सभेंत बोलेल त्याच्याशीं बोलण्या साठीं दुसरे लोक समर्थ होणार नाहींत.

श्लोक.

नराणांफलंकीर्तितंयत्समासात्तदेवांगनानांच

वान्यंसुधीभिः॥ नृणांदारतोयच्छुभंवाऽशुभंवाफलं तस्त्रियाभर्तृतोयोजनीयं॥२॥

टीका.— जीं पुरुषांचीं फलें सांगीतलीं तीच संक्षेपानें स्त्रियांचीं होतात यास्तव विद्वानानीं तींच स्त्रियांस सांगावीं परंतु बहुधा जें स्त्रियांस शुभाशुभ फल येईल तें तिच्या भर्त्यास योजावें.

श्लोक.

अयोग्यंयदिस्यान्मृगाक्ष्याः फलंतत्पतौकल्पनीयंतदाजातकज्ञैः॥ स्त्रियालग्नतोरंध्रगः पापखेटोयदिस्यात्सोभर्तृनाशंकरोति॥३॥

टीका.— जें स्त्रियांस अयोग्य फल वाटेल तें तिच्या नवऱ्यास होईल. असें सांगावें. आणि जर स्त्रियेच्या जन्मलग्नापासून अष्टम स्थानीं पापग्रह असेल तर तो भर्त्याचा नाश करील.

श्लोक.

समेलग्नकेयुग्मराशिस्थितेंदौसुरूपांगनासुस्थिराख्यास्वरूपा॥ शुभैः स्वद्युयंवीक्षितंचेद्ग्रहैःसासुशीलासुवेषाभवेद्भर्तृभक्ता॥४॥

टीका.— सम लग्न युग्मराशीस चंद्र असें असतां जर स्त्रीचा जन्म होईल. तर ती सरूप स्थिरस्वभावाची अशी होईल. आणि जर तें लग्न शुभ ग्रहानीं पाहिलें असेल तरती स्त्री चांगल्या स्वभावाची उत्कृष्ट मर्यादा युक्त वेष धारण करणारी आपल्या नवऱ्याच्या आज्ञेंत वागणारी अशी होईल.

श्लोक.

अयुग्मांगकेंदौचपुंबुध्दिशीलाकुरूपानराकारिणीवाकुवेषा॥ खलैर्वीक्षितंचेद्ग्रहैस्तद्गुणो

नाकुशीलाबलापापिनीभर्तृदुष्टा ॥५॥


टीका- युग्म राशींस चंद्र नसतां जन्मलेली स्त्री पुरुष स्वभावाची, कुरूप पुरुषा सारख्या आकाराची कुत्सित वेष धारण करणारी अ शी होईल. आणि जर तें लग्न पापग्रहानीं पाहिलें असलें तर ती वा ईट स्वभावाची, पापाचरण करणारी, नवऱ्यानें वाईट करणारी होईल.

हा ग्रंथ ज्योतिषा पैकीं आहे तेव्हां यांतील राश्यादि अव- श्य पदार्थांच्या संज्ञा व नावें कळण्या करितां मुहूर्त माला ग्रंथांत सं ज्ञा प्रकरणी राश्यादिकांचे नावाचे कोश सांगीतले आहेत ते येथें लो कोप योगार्थ लिहितों.

राशींचानावाचाकोश.

मेष. क्रिय, ओज, अज, प्रथम,
वृषभ. वृष, गौः वृषभ, ताबुरिः, द्वितीय,
मिथुन. मिथुन, नृयुग्मं, वीणा, यम, जितुमं, मन्मथ, तृतीय,
कर्क. कर्कट, कुली र, कर्कि, चतुर्थ,
सिंह. हरिः, पंचम,
कन्या. कन्यका, युवतिः योषित्, षष्ठ,
तूळ. तुल, तुला, वणिक्, पथ, तौलि, जूक, धट, सप्तम,
वृश्चिक अलि, कौर्प्य, वृश्चिक, अष्टम,
धन धनुःहय, नवम,
मकर धन्वी, तौक्षी, नक्र, मकर, मृग, दशम,
कुंभ. कुंभ, घट, एकादश,
मीन. मत्स्य, अंत्य, द्वादश,

द्वादशभावांचा नावाची कुंडली.



द्वादशभावांचा नावांचा कोश.

१ तनु. प्रथम. लग्न, विलग्न, मूर्ति, उदय, अंग, आद्य,
२ धन. द्वितीय. अर्थ, कुटुंब,
३ सहज. तृतीय. दुश्चिक्य, सोदर, सहोदर, विक्रम, पराक्रम,
४ सुहृत्. चतुर्थ. पाताल, बांधव, हिबुक, अंबु, सौख्य,
५ सुत. पंचम. मति, प्रतिभा,
६ रिपु. षष्ठ. क्षत, रोग,
७ जाया. सप्तम. स्त्री, द्युन, योषित्, अस्त, जामित्र, मन्माय,
८ मृत्यु. अष्टम. मृति, पराभव, रंध्र,
९ धर्म. नवम. तप, गुरुग्रह, भाग्य,
१० कर्म. दशम. मेषूरण, आस्पद, ख, शासन, मध्य, व्यापार, मा
,, ,, न, राज्य, पितृ,
११ आय. एकादश. उपांत्य, लाभ, प्राप्ति, आगम, भव,
१२ व्यय. द्वादश. रिःफ, अंत्य,

याशिवाय या नावांचा अर्थ समजण्याजोगे जे शब्द असतील त्या नावांनींही हे भाव समजावे.

ग्रहांच्यानावांचाकोश.

रवि. सूर्य, सूर, अर्यमा, आदित्य, भास्कर, अहस्कर, ब्रध्न, प्रभाकर, विभाकर, इनः,

चंद्र. अब्ज, जैवः, अत्रिकः, सोमः, ग्लौः, मृगांकः, कलानिधिः, द्विजराजः, शशधरः, नक्षत्रेशः, क्षपाकरः, हिमांशुः, चंद्रमाः, चंद्रः, इंदुः, कुमुदबांधवः, विधुः, सुधांशुः शुभ्रांशुः, ओषधीशः, निशापतिः,

मंगळ. अंगारकः, कुजः, भौमः, लोहितांगः, महीसुतः,

बुध. रौहिणेयः, बुधः, सौम्यः, इंदुजः,

गुरु. बृहस्पतिः, सुराचार्यः, गीष्पतिः, धिषणः, गुरुः, जीवः, आंगिरसः, वाचस्पतिः, चित्रशिखंडिजः,

शुक्र. शुक्रः, दैत्यगुरुः, काव्यः, उशना, भार्गवः, कविः,

शनि. सौरिः, शनैश्चरः, मंदः, पंगुकायः, रविसुतः,

राहु. तमः, स्वर्भानुः, सैंहिकेयः, विधुंतुदः,

केतु. तमः, शिखी, राहुपुच्छं,

जातकभावनिर्णयांतीलफलानुभव.

आतां केवळ लोक हिताकरितां विद्यारण्यनामक महा सिद्ध पुरुषानें केलेल्या जातक भाव निर्णय नावाच्या ग्रंथांतील कोणत्या ग्रहापासून कोणत्या कार्य संबंधें फलानुभव होईल, किंवा पहाव याविषयीं सांगितलें आहे तेवढेंच प्रकरण एथें या ग्रंथास फारच

उपयोगी पडेल असें जाणून वरून लिहितों.

श्लोकार्ध ॥ आत्मप्रभावशक्तिं चपितृचिंतांर
विर्विदेत् ॥ १ ॥

अर्थ ॥ रवि पासून स्वकीय प्रभाव, आणि आपल्या पित्या विषयीं- सुख दुःख, तो रवी, जसा ज्याभावीं, शत्रु, मित्र, सम, उच्च, नीच, स्वगृह, शत्रू मित्र क्षेत्र, यापैकीं विरुध असेल तसें फल होईल.

श्लोकार्ध ॥ मनोबुध्दि प्रसादंचमातृचिंतांच
चंद्रतः ॥ १ ॥

अर्थ ॥ मन, बुद्धि, यांचा पासून प्रसाद् आणि माते विषयीं सुख- दुःख हीं फलें होतील. रवि विषयीं जो भावादि विचार सांगितला तो सर्व ग्रहा विषयीं पहात जावा.

श्लोकार्ध ॥ मातृसत्वगुणान्भूमिंभौमेनतुवि
चिंतयेत् ॥ १ ॥

अर्थ ॥ आपल्या मातेचें सत्व, आपले गूण, आपली भूमी, हीं भौमा पासून पहावीं.

श्लोकार्ध ॥ प्रज्ञावत्कर्मविज्ञानंबुधेनतुविचिं
तयेत् ॥ १ ॥

अर्थ ॥ बुद्धीमत्तेचें, कर्म, विज्ञान ह्मणजे कोणतेंही काम करणें याविषयीं बुधाच्या अनुकूल्या प्रमाणें फलें होतील.

श्लोकार्ध ॥ गुरुणादेहपुष्टिश्चपुत्रार्थधनसंपदः
॥ १ ॥

अर्थ ॥ गुरुच्या अनुकूल्या प्रमाणें शरीर संपत्ती, पुत्र, द्रव्य, आणि पाशि लाच सर्व शोभा इत्यादि विचार पहावा.

श्लोकार्ध ॥ छत्रंवाहनकीर्तीचदाराचिंतांचशक्रनः ॥ १ ॥

अर्थ ॥ छत्र, वाहन, कीर्ति, आणि स्त्री इत्यादि शुक्रानुकूल्यानें प्राप्त होतील.

श्लोकार्ध ॥ आयुष्यंजीवनोपायंमरणंचशनैश्चरात् ॥ १ ॥

अर्थ ॥ आयुष्य, जीविकेचा उपाय, आणि मरण इत्यादि फलें शनैश्चरापासून होतील.*

ज्योतिःशास्त्र करणाऱ्या ऋषी पैकीं एक मत असें आढळलें आहे कीं;

श्लोकार्ध ॥ तमोग्रहोराहुकेतू शनिवत्फलमेतयोः ॥ १ ॥

अर्थ ॥ राहु, केतू हे तमो ग्रह म्हणजे अंधःकाररूपी आहेत यांचीं फलें शनी प्रमाणें समजावीं (मलावाटतें कीं विद्यारण्य स्वामीचें ही असेंच मत आहे. कां कीं त्यानीं स्वकृत ग्रंथांत राहुकेतुंचा विचार सांगीतला नाहीं.)

आतां ह्या ग्रंथास अवश्य उपयोगी असे कांहीं विषय लोकोपयोगा करितां घेतले आहेत.

---

* आतां पारशी ग्रंथकाराच्या मतें रवी बादशाह, चंद्र वजीर, भौम सेनापती, बुध पेशाजी, बृहस्पती वस्ताद, शुक्र चैन, शनी खजानची, राहु तोफखाना, केतु मरण या मताचा अभिप्राय असाच वाटतो कीं हे ग्रह जसजसे अनुकूल आणि प्रतिकूल असतील तसतसे आप आपल्या अधिकारा नुरूप सुख दुःख देवविणारे आहेत.

जातकप्रकरणींउपयोगीविषय.

जन्मकाळचींशुभाशुभफलें.

श्लोक ॥ अश्विनीमघामूलानांपूर्वार्धेबाध्यतेपिता ॥ पूषादिशाक्रपश्चार्द्धेजननीबाध्यतेशिशोः ॥ सर्वेषांगंडजातानांपरित्यागोविधीयते ॥ वर्जयेद्दर्शनंशावंतच्च षाण्मासिकंभवेत् ॥ १ ॥

टीका. अश्विनी, मघा, मूल, या नक्षत्रांतें पूर्वार्धीं जन्म झाला तर बापास वाईट, आणि रेवती, ज्येष्ठा, यादोन नक्षत्रांच्या उत्तरार्धीं जन्म झाल्यास मातेस वाईट, आणिं गंडांतांत जन्म झाल्यास. मुलाचा त्याग करावा अथवा साहा महिने तोंड पांहूं नये.

कृष्णचतुर्दशीचें फल.

कृष्णपक्षेचतुर्दश्यांप्रसूतेः षड्विधंफलं ॥ चतुर्दशीचषड्भागं कुर्यादादौशुभंस्मृतं ॥ १ ॥ द्वितीयेपितरंहंतितृतीयेमातरंतथा ॥ चतुर्थेमातुलंहंतिपंचमेवंशनाशनंस् ॥ २ ॥ षष्ठेच धनहानिः स्यादात्मनोवंशनाशनं ॥

टीका कृष्ण चतुर्दशीस जन्म झाल्यास तिथीचे ६ भाग करावे त्याचीफलें प्रथम भाग १० घटिकांचा शुभ. द्वितीय पित्यास वाईट. तृतीय मातेस वाईट. चतुर्थ मातुळास, पांचवा वंशास. साहावा धन. आणि आत्मवंश नाशक असें जाणावें.

अमावास्येचेंफल.

सिनीवाल्यांप्रसूताश्चदासीभार्यापशस्तथा ॥ गजाश्चमहिषीचैवशक्रस्यापिश्रियंहरेत् ॥ १ ॥ कुहूप्रसूतिं स्त्यर्थेसर्वदोषकरीस्मृता ॥ यस्यप्रसूति

ऐन्तेषांतस्यायुर्धननाशनम् ॥ २ ॥ सर्वगंडसमस्त प्रदोषस्तु प्रबलोभवेत् ॥ ३ ॥

टीका. चतुर्दशी युक्त अमावास्येस दासी, अथवा भार्या, गाय, हत्तीण,- घोडी, हैस, हीं प्रसूत झालीं असतां स्वामीची संपत्ति जाईल, अमावा स्येस प्रसूत झाली असतां पुष्कळ दोष आणि स्वामीच्या आयुष्याचा व धनाचा नाश आणि गंडांताचा प्रसूत कालीं बहु दोष.

दिनक्षयादि.

दिनक्षयेव्यतीपातेव्याघातेविष्टिवैधृतौ ॥ शूले गंडेतिगंडेचपरिघेयमघंटके ॥ १ ॥ कालगंडेमृत्यु योगेदग्धयोगेसुदारुणे ॥ नक्षिणोडदिनेप्रासंप्र सूतिर्यदिजायते ॥ २ ॥ अतिदोषकरीप्रोक्ता तत्र पापयुतेसति ॥ ३ ॥

टीका. दिनक्षय, व्यतीपात, व्याघात, कल्याणी, वैधृती, शूल, गंड अति गंड परिघार्ध, यम घंट, कालगंड, मृत्युयोग, दग्धयोग, आणि दारुण यो ग यांवर जन्म झाल्यानंतर मोठा दोष आणि ती स्त्री पाप युक्त असें जा णावें.

ज्येष्ठानक्षत्रांचेंफल.

ज्येष्ठादौजननीमाताद्वितीयेजननीपिता ॥ तृ तीयेजननीभ्रातास्वयमाताचतुर्थके ॥ १ ॥ आ त्मानंपंचमेहंतीषष्ठेगोत्रक्षयोभवेत ॥ सप्तमे- चोभयकुलंज्येष्ठभ्रातरमष्टमे ॥ २ ॥ नवमेश्व- शुरंहंतिसर्वंहंतिदशांशकः ॥

टीका. ज्येष्ठा नक्षत्रावर जन्म झाला असल्यास त्याचे भाग ६ घटिका प्रमाणें १० करावे. त्यांचें फळ असें कीं, प्रथम भाग मातेचे आईस वाई

र, दुसरा भाग मातेचे बापास वाईट. तिसरा मातुलांस, चौथाभाग मा तेस पांचवा भाग मुलांस. साहावा भाग गोत्रजांस. सातवा भाग आई चे बापाचे कुळास. आठवाभाग वडील भावांस. नववा भाग श्वशुरांस. दा हावा भाग सर्वांस वाईट असें जाणावें.

मूळ नक्षत्राचेंफल.

मूलंस्तंभं त्वचाशाखापत्रंपुष्पंफलंशिखा॥ वे
दाश्चसुनयश्चैवदिशश्च वसवस्तथा॥१॥ नंदा
बाणारसारुद्रामूल भेदाः प्रकीर्तिताः॥ मुलेमूल
विनाशायस्तंभेहानिर्धनंक्षयः॥२॥ त्वचि भ्रातृ
विनाशायशाखामातुर्विनाशकृत्॥ पत्रेसपरि
वारः स्यात्पुष्पेषुनृपवल्लभः॥३॥ फलेषुलभ-
तेराज्यंशिखायामल्पजीवितं॥

टीका. मूळ नक्षत्रास मूळ वृक्ष असें नामाभिधान आहे. त्याच्या स्क मारें घटी ६० यांचीं स्थानें अशीं कीं प्रथम चार घ० वृक्षानें मूळ स्थान-जन्म झाला असतां नाश. द्वितीय भाग ७ घटी स्तंभ हानी. धनाचा ना श तिसरा भाग १० घटि साल भावास वाईट. चौथा भाग ८ घटींत व त्याच्या रवांद्या मातेस वाईट. पांचवा भाग ९ घटी वृक्ष पत्रें परिवारांस-वाईट साहावा भाग ५ घटी वृक्षा० पत्रें राजमंत्री सातवा भाग ६ घटी वृक्षफळ राज्याची प्राप्ति. आठवा भाग ११ घटी वृक्ष शें ड्यांत जन्म झा ला असतां अल्पायुषी, असें साठी घटिकांचें मान जाणावें.

जन्मकाळींमूळनक्षत्रकोणातेलो कींआहेतेंपाहावयाचीलग्नें.

वृषादिसिंहेसुघटेनृमूलदिविस्थितंयुग्मतु
लांगनान्येपातालगंमेषधनुः कुलीरनक्रेषुम-

स्त्रींषियांतिसंस्मरंति॥१॥

टीका. वृषभ, वृश्चिक, सिंह कुंभ या चोहोंतून एखादे लग्नीं जन्म जा हाला असतां त्यादिवशीं मूळ नक्षत्र स्वर्गी आहे, याचें फल राज्य प्राप्ति; आणि मिथुन, तूळ, कन्या, मीन यालग्नीं जन्म जाहाला असतां पाताळीं आहे त्या लग्नाचें फल धन प्राप्ति, आणि मेष, धन, कर्क, मकर यालग्नीं जन्म जाहाला तर मृत्यु लोकीं आहे त्याचें सर्व फळ कुटुंबास वाईट अ सें बारा लग्नाचें फल वेगळें जाणावें.

आश्लेषानक्षत्राचानराकारवृक्ष.

मूर्धास्यनेत्रगलकांसयुगंचबाहुत्ररज्जानुगुह्य
पदेमनुजाहिदेहभागाः॥बाणाद्रिनेत्रहुतभुक्श्रु
तिनागरुद्रषण्नंदपंचशिरसः क्रमशोरसनाड्यः
॥१०॥राज्यंपितृक्षयोमातृनाशः कामक्रिया
रतिः॥ पितृभक्तोबलीस्वघ्नस्त्यागीभोगीधनी-
क्रमात्॥ २ ॥

टीका. आश्लेषा नक्षत्राच्या घटिकांची नराकार स्थानें. प्रथम ५ घ टिका मस्तक, त्याचें फळ राज्यप्राप्ति, दुसरा विभाग ७ घटिका मुख हें बापास वाईट, तिसरा भाग २ घटिका नेत्र हामातेस वाईट, चवथा भाग ३ घटिका गळा, त्याचें फळ स्त्री रत, पांचवा भाग ४ घटिका दोन्हीं खां दे, हा पितृभक्त, साहावा भाग ८ घटिका दोन्हीं बाहू, फळ, बळकट, सा तवा भाग ११ घटीहृदय आत्मघाती, आठवा भाग ६ घटिका दोन्हीं मांडे त्यागी, नववा भाग ९ घटिका गुह्य भोगी, दाहावा भाग ५ घटि- का दोन्ही पाय, धनवान्, ज्या भागांत जन्म होईल त्याचें फळ स्थान- परत्वें ध्यावें.

मुळाचेजन्मलग्नास मृत्युकारकग्रह

चंद्राष्टमंचधरणीसुतसप्तमंचराहुर्नवंचशनिज-
न्मगुरुस्तृतीये ॥ अर्कस्तुपंचभृगुषष्ठबुधश्चतुर्थे
जातोनजीवतिनरः प्रवदंतिसंतः ॥ १ ॥

टीका. जन्मलग्नापासून चंद्र अष्टम स्थानीं, भौम ७ स्थानीं, राहू नवम स्थानीं, शनी जन्मलग्नीं, गुरु तृतीय स्थानीं, सूर्य पंचम स्थानीं, शुक्र षष्ठस्थानीं, बुध चतुर्थ स्थानीं, असे ग्रह आलेतर मूल वांचणार नाहीं.

जन्मलग्नींमुलानेबायकोसमृत्युकारक.

षष्ठेच भुवने भौमोराहुः सप्तमसंभवः ॥ अष्टमे-
चयदासौरिस्तस्यभार्यानजीवती ॥ १ ॥

टीका. जन्मलग्ना पासून षष्ठ स्थानीं भौम, राहु, सप्तम स्थानीं शनी, ८ स्थानीं असा योग ग्रहांचा असल्यास त्या मुलाची बायको वांचणा रनाहीं.

चांगलेपराक्रमाचेग्रह.

मूर्तौशुक्रबुधौयस्यकेंद्रेचैवबृहस्पतिः ॥ दशमो
ऽगारकश्चैवसज्ञेयः कुलदीपकः ॥ १ ॥

टीका. जन्मलग्नीं शुक्र, बुध आणि केंद्र, (ह्मणजे प्रथम, चतुर्थ, सप्तम दशम, यांस ह्मणतात) या स्थानीं बृहस्पती दशम स्थानीं भौम, असल्यास तो मूल कुल दीपक असें जाणावें.

पराक्रमीग्रह.

नैवशुक्रोबुधोनैवनास्तिकेंद्रेबृहस्पतिः ॥ दश
मोंगारकोनैवजातकंकिंकरिष्यति ॥ १ ॥

टीका. लग्नीं शुक्र, बुध, अथवा केंद्रीं, बृहस्पति, किंवा दशम स्थानीं अंगारक यांतून कोणी ग्रह नसला तर जन्म होऊन व्यर्थ जाणावें.

जातिभ्रंशकारक.

धनस्थानेयदासौरिः सैंहिकेयोधरात्मजः॥ शुक्रोगुरुःसप्तमेचत्वष्टमेरविचंद्रकौ॥ ब्रह्मपुत्रेपदृष्टापिवेश्यारूत्वसदारतिः॥ प्राप्तेविंशतिमेवर्षेम्लेंच्छोभवतिनान्यथा॥

टीका. धन स्थानीं, शनी, राहु, मंगळ अथवा, सप्तम स्थानीं शुक्र, गुरु अष्टम स्थानीं रवि चंद्र, असे ग्रह असतां ब्राह्मण जन्म असला तथापि वेश्येशीं रत असेल, आणि वीस वर्षांचा जाहाला ह्मणजे म्लेंच्छ होईल.

मातापितरांसनाशक.

षष्ठेचद्वादशेराशौयदापापग्रहोभवेत्॥ तदा मातुर्भयंविद्याच्चतुर्थेदशमेपितुः॥१॥

टीका. षष्ठ स्थानीं, अथवा द्वादश स्थानीं, पापग्रह असला तर मातेस वाईट, किंवा चतुर्थ. दशम स्थानीं असला तर पित्यास वाईट, असें समजावें.

नाशवंतग्रह.

अर्केराहुःकुजःसौरिर्लग्नेतिष्ठतिपंचमे॥ पितरंमातरंहंतिभ्रातांचशिशून्क्रमात्॥१॥

टीका. जन्म लग्नापासून पंचम स्थानीं ग्रह आले. तर त्यांचीं फळें, रवी असल्यास पित्यास वाईट. राहु मातेस, भौम भ्रात्यास; शनि आपल्यास मुलास मृत्यु कारक असें क्रमें करून जाणावें.

लग्नस्थानेयदासौरिःषष्ठेभवतिचंद्रमाः॥ कुजस्तुसप्तमस्थानेपितातस्यनजीवति॥२॥

टीका. जन्म लग्नीं शनी, षष्ठ स्थानीं चंद्र, सप्तम स्थानीं मंगळ, असे असले तर पित्यास मृत्यु कारक जाणावें.

पातालस्थोयदाराहुश्चेंदुः षष्ठाष्टमेपिच ॥ पाप
दृष्टोपिशेषेणासद्यः प्राणहरः शिशोः ॥ ३ ॥

टीका. जन्म लग्नापासून सप्तम स्थानीं राहु, षष्ठ अथवा अष्टम स्थानीं चंद्र आणि शेष ग्रहांची पापदृष्टी असल्यास जन्म होतांच मृत्यु जाणावा.

जन्मलग्नेयदाराहुः षष्ठोभवतिचंद्रमाः ॥ जा
तोमृत्युमवाप्नोतिकुदृष्ट्यालपमृत्युना ॥ ४ ॥

टीका जन्म लग्नीं राहु, षष्ठ स्थानीं चंद्रमा असे असल्यास जन्म होतांच मृत्यु आणि जन्म लग्नावर कुदृष्टी असली तर अपमृत्यु.

जन्मलग्नेयदाभौमश्चाष्टमेचबृहस्पतिः ॥ व
र्षेचद्वादशेमृत्युर्यदिरक्षतिशंकरः ॥ ५ ॥

टीका. जन्मलग्नीं मंगळ, अष्टमस्थानीं बृहस्पति असे असलेतर बारावे वर्षी शंकर रक्षित असला तथापि मृत्यु प्राप्त होतो.

शनिक्षेत्रेयदासूर्योभानुक्षेत्रेयदाशनिः ॥ व
र्षेचद्वादशेमृत्युर्देवोवैरक्षितायदि ॥ ६ ॥

टीका. शनीचे गृहांत सूर्य, अथवा सूर्याचे गृहांत शनी. असें जन्म काळीं असल्यास देव रक्षित असतांही बारावे वर्षी मृत्यु प्राप्त होतो.

षष्ठोष्टम स्तथामूर्तौजन्मकालेयदाबुधः ॥ च
तुर्थवर्षेमृत्युश्चयदिरक्षतिशंकरः ॥ ७ ॥

टीका. षष्ठ, अष्टम, अथवा जन्मलग्नीं बुध असला तर चवथे वर्षी शंकर रक्षित असतांही मृत्यु येतो.

भौमक्षेत्रेयदाजीवः षष्ठाष्टमश्चचंद्रमाः ॥ व
र्षेष्टमेपिमृत्युर्वैईश्वरोरक्षितायदि ॥ ८ ॥

टीका मंगळाचे गृहांत बृहस्पति, आणि षष्ठस्थानीं अथवा अष्टम स्थानीं चंद्रमा असल्यानंतर ईश्वर रक्षित असतां आठवे वर्षी मृत्यु जाणावा.

दशमोपियदाराहुर्जन्मलग्नेयदाभवेत् ॥ वर्षेतुषो डशेज्ञेयोबुधैर्मृत्युर्नरस्यच ॥९॥

टीका. जन्म लग्नापासून दशम स्थानीं अथवा जन्म लग्नीं राहु असला तरीं सोळावे वर्षी मृत्यु असें जाणावें.

ग्रहांच्या दृष्टी.

पादेकदृष्टिर्दशमेतृतीयेद्विपाददृष्टिर्नवपंचमेवा ॥त्रिपाददृष्टिश्चतुरष्टकेचसंपूर्णदृष्टिःसप्तसप्तके च॥शनेस्त्वेकादशेपूर्णादृष्टिर्जीवस्यकोणके ॥बु धैर्ज्ञेयापूर्णदृष्टिर्भौमस्यचतुरष्टके ॥१०॥

टीका, जन्म लग्नापासून दशम स्थानीं आणि तृतीय स्थानीं जे ग्रह अ सतील. त्यांची एक पाद दृष्टी जन्मलग्नावर असत्ये. याक्रमानें नव पंचम स्थानीं असतील त्यांची द्विपाद दृष्टी जाणावी, आणि चतुर्थ स्थानीं, अ ष्टम स्थानीं, जे ग्रह असतील त्यांची त्रिपाद दृष्टी, सप्तम स्थानीं अस तील त्यांची पूर्ण समदृष्टी जाणावी. जन्मलग्ना पासून शनैश्चर एकाद- शस्थानीं अथवा तृतीय स्थानीं असतां पूर्ण दृष्टी. पंचम अथवा नवम गुरु असल्यानंतर आणि चतुर्थ अष्टम स्थानीं भौम असला तर लग्नाव र संपूर्ण दृष्टी असत्ये.

ग्रहांचें उच्चनीचत्व.

रविर्मेषेतुलेनीचोवृषेचंद्रस्तुवृश्चिके ॥भौमश्च नक्रेकर्केचस्त्रियांसौम्योझषेतथा ॥गुरुः कर्के- चनक्रेचमीनकन्येसितस्यच ॥मंदस्तुलायांमे षेचकन्याराहुग्रहस्यच ॥राहुर्युग्मेतुचापेचत

मोवल्केतुजं फलम् ॥ भप्रोक्तं ग्रहाणामुच्चत्वं नीच त्वं च क्रमाद्बुधैः ॥

टीका. रवि मेषींचा असल्यास उच्चत्व, तूळींचा असल्यास नीचत्व, चंद्र वृषभीं असल्यास उच्चत्व, वृश्चिकीं असल्यास नीचत्व, भौममकरीं असलानर उच्चत्व, कर्कींचा असलानर नीचत्व, बुध कन्या राशीस असलानर उच्चत्व, मकरींचा नीचत्व, गुरु कर्कींचा उच्चत्व, आणि मकरींचा नीचत्व शुक्र मीनींचा उच्चत्व, आणि कन्येचा नीचत्व, शनी तूळींचा उच्चत्व आणि मेषींचा नीचत्व, राहुचें कन्या गृह, आणि मिथुनींचा उच्चत्व, आणि धनींचा नीचत्व आणि केतूचें शनैश्चराप्रमाणें जाणावें.

जन्मलग्नाचीं फळें

मेषेदैन्यमुपैतिगर्वितवृषेनानामतिर्मन्मथे शूरः कर्कटकेमृतीन्स्ववनपेकन्यात्वमायान्विता ॥ सत्यं वैवतुलेमलोमकिनतापापान्वितंवैधनु मूर्खोथमकरेथटेचतुरता मीनेल्पधीरामतिः ॥

टीका. मेष लग्नीं जन्म जाहाला असतां दीनपणा, वृषभीं गर्विष्ठ, मिथुनीं नाना प्रकारची बुद्धी, कर्कीं मोठा शूर, सिंह लग्नीं स्थीर बुद्धी, कन्या अत्यंत मायावी, तूळीं सत्यवादी, वृश्चिक लग्नीं मळीनता, धन लग्नीं पाप बुद्धी, मकरीं मूर्ख पणा, कुंभीं चतुरता, मीनीं अल्पधीरता, अशीं जन्मलग्नाचीं फळें जाणावीं.

ग्रहराशी भोगितात त्यांची संख्या आणि फळदेण्याची संख्या.

सूर्य. एक मास राशी भोगतो, त्यांत प्रथम ५ दिवस फळ देतो.
चंद्र. सवादोन दिवस १ राशि भो० त्यांत अंतीच्या ३ घटिका फळ देतो.
मंगळ. दिडमास १ रा० भो० त्यांतील प्रथम ८ दिवस फळ देतो.
बुध. एक मास १ रा० भो० त्यानें सर्व दिवस फळ जाणावें.

गुरु. तेरामास १रा० भो० त्याचें फळ मध्यभागीं २मास जाणावें.
शुक्र. एक मास १रा० भो० त्यांतील मध्यभागीं ७दिवस फळ जाणावें.
शनि. तीस मास १रा० भो० त्यांत अंतींचें ६महिने फळ देतो.
राहु. व केतु. } अठरा महिनें एकराशी भोगितो त्याचे अंतीचें ३मासफ०देतो.

पुरुषजातक.

जन्मलग्नीं लग्नादि द्वादशस्थानीं जेग्रह येतील त्यां०प्र०फ०जा०को.

संख्या	स्थानें.	रवि.	चंद्र.	मंगळ.	बुध.	गुरु.	शुक्र.	शनिराहु.के.
१	तनु	अंगपीडा.	कांति आणि सुख.	रक्तकोप.	कांति आणि सुख.	कांति आणि सुख.	कांती आणि-सुख.	अनिदुःखदायक.
२	धन	अनिदुःखव धनाचा नाश.	संपत्ती असं त प्राप्ती.	दुःखप्राप्तथ नाचानाश.	नानाप्रकारची स० प्राप्त	नानाप्रकार-चीसंततीप्रा०	नानाप्रकारची संपत्ती प्राप्त.	अनिदुःखप्राप्त धनाचा ना श०
३	सहज	निरोगी असे ल.	कीर्ती मिळ-वील.	कोपयुक्त अ सेल.	समृद्धी.	सुबुद्धीवान्	नानावेष धार ण करील.	स्त्रियांस प्रिय होई ल.
४	सुहृत	शरिरास पी डाबहुतहोई.	सुख भोगी ल.	शरिरास पीडा बहुत होईल.	सुख भोगील	सुख भोगी-ल.	सुख भोगील	शरिरास पीडा बहूत होईल.
५	सुत	थोडा रागीट-होईल.	बहुत पुत्रहो तील.	संतती होणा र नाही.	अल्पपुत्रसंत तीहोईल.	बहुतपुत्रप्रा प्त.	बहुतपुत्रहो तील	संततीच होणारना हीं.
६	रिपु	शत्रूचा नाश करील.	मरणपावेल.	शत्रूचानाश क रील.	बुद्धीहीन बहु रोगी असेल	शरीर शिक-स्त असेल	बुद्धिहीनवरो-गबहुतअसे०	शत्रूनेगृहीं पूजहो ईल.
७	जाया	बायकोदुष्टक-र्मीसंतती अ०	स्त्रीरूपवानूव गुण.व०.ए०	स्त्रीदुष्टकर्मींव संतती अल्प	स्त्रीरूपवानूआणिमनहरणकरणारीवबुद्ध पुत्रहोतील असी चांगलेस्वभावाची प्रा०हो०			स्त्रीदुष्टकर्मी आणि संतती थोडी उत्पन्न.
८	मृत्यु	सर्वग्रहांचेंफल एकत्र आहे दुष्टबुद्धी व शस्त्रपातीं करून शरिरास पीडा होईल, सौख्यरहित असेल-आणिरोगी असेल जो ग्रह ज्यास्थानीं असेल त्याणी ध्यावें.						
९	धर्म	अधर्मीदुष्ट मती दुष्टरी०	धार्मीकहोई ल.	अधर्मी दुष्टम-ती दुष्टशील	धर्म निरंतरक रील.	धर्मनिरंतर करील.		अधर्मी बुद्धीहीन दुष्ट-बुद्धीहोईल.
१०	कर्म	अत्यंत दुष्टक र्मी वकुपुत्रवा०	अत्यंत कीर्ती वान होईल.	दुष्ट कर्मी व कु पुत्री होईल.	कर्ती चांगली.	शुभकर्मकरी ल.	संपत्तीवान्	फार दुष्टकर्मी व कुपु त्रहोतील.
११	आय	राजासीसमा गमकरील.	धनपुष्कळमि ळवील.	पृथ्वीचेराज्यआणि सेनलाभहो०	विवेकयुक्तअ णिसुंदर अ०	धनआणिअ श्वप्राप्ती	गुणवान् असे ल.	चांगली कीर्ती मिळवी ल.
१२	व्यय	दुष्टशील	काणाहोईल.	पाप कर्म आ चरेल.	गत धनी अ सेल	कृशांग असे ल.	व्याधिस्त.	नीब्रला असेल.

56 pr
(५६)

स्त्रीजातकाचें कोष्टक.

सं.	नावें	रवि.	चंद्र.	मंगळ.	बुध.	गुरु.	शुक्र	शनि	राहु केतु
१	तनु.	विधवा.	आयुष्याचा नाश.	विधवा.	पतिव्रता.	पतिव्रता.	पतिव्रता.	दरिद्री.	पुत्रमस्तील.
२	धन.	दरिद्रदुःख	बहुपुत्रवान्	दरिद्रदुःख	सौभाग्य-आणिसंप.	सौभाग्य आ. सं.	सौभाग्य आ. सं.	दरिद्रदुःख	दारिद्र्यादुःख
३	सहज	पुत्रवान्धनाढ्य	पुत्रवान्धनाढ्य	पुत्रवान्धनाढ्य	पुत्रवान् धनाढ्य	पुत्रवान्-धनाढ्य	पुत्रवान् धनाढ्य	लक्ष्मीवान्	लक्ष्मीवान्
४	सुहृद्	दरिद्रता	दौर्भाग्य	अल्पसंतती	अतिसौख्य	अतिसौख्य	अतिसौख्य	दुग्धअन्न	पुत्रनाश.
५	सुत	मुलांचा-नाश.	कन्यापुष्कळ.	मुलांचा नाश	बहु फल प्राप्ती.	बहुफल प्राप्ती.	बहुफल प्राप्ती	रोगी	मरणपावेल
६	रिपू.	धनवान्.	विधवा.	धनवान्	कलहरूपअप्रिया	धनवान्	दारिद्रीवेश्या.	धनवान्	धनवान्.
७	जाया	रोगी	प्रवासी	विधवा	क्षय	भयबंधन	मृत्यु	वैधव्यमरण.	वित्तनाश.
८	मृत्यु	विधवा	वियोगमरणांत	धनवान्	स्वजनवियोग	स्वजनवियोग	मरणांतवियोग	अल्पपुत्रसंतती.	मरणांतवियोग
९	धर्म	धर्मपुण्यकर्तील	संततीवान्	धर्मकृत्यकारक	उत्तमभोगी.	धर्मवृद्धी	धर्मवृद्धी	वांझ.	वांझ.
१०	कर्म	पापकारिणी.	दरिद्रीजारिणी.	मृत्यु.	धनवतीवरासभोगी	धनवतीवरासभोगी	धनवतीवरासभोगी	पापकर्मी	वैधव्य.
११	आय	अल्पपुत्रप्राप्ती.	लक्ष्मीवान्.	पुत्रअसंत	सुखी	आयुष्यवान्.	पुत्रवान	धनवान्	सौभाग्यवती
१२	व्यय	खर्चिक	दिनांध	वांझजारिण	सुपुत्र	सुशील	पतिव्रता	खर्चिक	जारिणीकर्मी

ह्यापुस्तकास आश्रयदेणारांचींनावें.

ठिकाण	नावें.	प्रतिचीसं.	ठि.	नावें.	प्र.
पुणें.	रावसाहेब मोरोरघुनाथटमढे.	१०	नगर	रा. खंडेराव बाळाजीफडके.	१०
,,	रा. हरिविठ्ठल मराठे.	१४	ग्वालेर	,, रामचंद्र तात्याजीफडके.	१०
,,	,, बाबजीश्रीधर गोंधळेकर	२५	बडोदें	,, रामभाऊ मराठे	१०
,,	,, कृष्णाजी नारायण रानडे.	१०	जोगाईचेअंबे	रा. कृष्णा त्रिंबकराव.	१०
,,	,, शिवराम दिनकर धारपुरे.	१०	पुणें	,, गणेशहरी साठे	१०

,, ,, ह्याहाचे अंत प्रतीघेणारांचीसंख्या ११३ आणिप्रतीचीसंख्या २३७